# माळीचिंचोरा येथे रासेयो शिबिराचे आयोजन

**पुण्यनगरी वृत्तसंस्था/नेवासा फाटा**

'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन समाजसेवा करणाऱ्या महाविद्यालयीन युवकांमधून समर्थ भारत घडेल, असे प्रतिपादन मुळा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब मोटे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई व कॉलेज ऑफ फार्मसी सोनई यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी भाऊसाहेब मोटे बोलत होते.



**माळी चिंचोरा** - राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्‌घाटन करताना मान्यवर.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुरेखाताई घानापुणे होत्या. तर प्रमुख अतिथी जयश्री गडाख ,तुकाराम शेंडे, माजी संचालक एकनाथ घानापुणे, प्रकाश नारळे आदी मान्यवर उपस्थित होते. ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक नवनाथ आगळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सोनई महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. विठ्ठलराव दरंदले यांनी शिबिराचे उद्दिष्ट व नियोजित शिबिराची रूपरेषा स्पष्ट केली. या शिबिरामध्ये श्रमदानातून वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, वनराई बंधारे निर्माण करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर ग्रामस्थांसाठी दंतचिकित्सा शिबीर रक्तदान शिबिराचेही आयोजन केले आहे. तसेच 'बेटी बचाव बेटी पढाव' प्रभातफेरीचे आयोजन केले जाईल तसेच गावाचा इतिहास लेखन व जी.एस.आय मॅपिंगद्वारे नकाशा तयार केला जाईल. परीसरात आढळणाऱ्या औषधी व सुगंधी वनस्पतींची माहिती ग्रामस्थांना दिली जाईल. त्याचप्रमाणे सायबर क्राईम, स्वामी विवेकानंद व आजचा युवक, आधुनिक शेती, सेंद्रिय शेती, महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत, शेती व्यवसायातील सद्यस्थिती व आव्हाने याविषयीचे व्याख्यान आयोजित केली आहेत. त्याचप्रमाणे शिवशाहीर कल्याण काळे यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम तसेच सतीश आहेर यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित केला आहे. उद्घाटनप्रसंगी मयुरी शेंडे ,पुरुषोत्तम चिंधे, एकनाथ घानापुणे, माया शेंडे, नजन गुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे, प्राचार्य डॉ. शंकर लावरे, उपप्राचार्य डॉ. विलास घावटे यांनीही शिबिरार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राध्यापक तुकाराम जाधव यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक शरद औटी, प्राध्यापक राहुल निपुंगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राध्यापक अभिषेक दरंदले, प्राध्यापक डॉ. बाळसाहेब जगताप, प्राध्यापक रेणुका सरगैय्ये यांनी परिश्रम घेतले.

यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आश्रमशाळेच्या वतीने सत्काराही